2015
APR-MAY

# Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

(Bi-Monthly)
Peer-Reviewed Journal
Impact factor: 0.948

VOL-IV Issues: III

**Chief-Editor:**

**Ubale Amol Baban**

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No IV Issues III
APRIL-MAY 2015 ISSN 2278-5655

# बौद्धधर्म व भक्तिवाद

**प्रा.सुचित्रा शरद ताजणे,**

संस्कृत विभाग,मुंबई विद्यापीठ,

सांताक्रुज(पू) ४०००९८

आस्तिक नास्तिक दर्शनांमध्ये बौद्ध दर्शन हे नास्तिक दर्शन म्हणून ओळखले जाते. नास्तिक अर्थात जे वेदप्रामाण्य व ईश्वर मानत नाही . बौद्ध धर्म दर्शन प्रमुखत्वे तीन वादांवर आधारलेले आहे.

1. अनात्मवाद-
2. अनीश्वरवाद-
3. क्षणिकवाद

बौद्ध धर्म इश्वराला मानत नाही तसेच मूर्तिपूजेचा निषेध ही केला आहे.जर हे सत्य आहे तर काही प्रश्न आपल्यासमोर उभे राहतात बौद्ध धर्मामध्ये भक्तीवाद आहे का? भक्ति कशी निर्माण झाली ? बौद्ध धर्मात भक्तीचे आज स्थान काय ? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात केला जाणार आहे .बुद्धांच्या निर्वाणानंतर बौद्ध मतामध्ये अनेक संप्रदाय (schools) निर्माण झाले. हे मतभेद तात्विकपेक्षा धार्मिकतेवर अवलंबून आहेत .प्रथम पक्ष जो आहे त्याने बुध्द वचनाचा शब्दश: अर्थ ग्रहण केला.स्वप्रयत्नाने प्रत्येक व्यक्तीने स्वत:करीता नैतिक आचरण व ध्यान यांच्याद्वारा निर्वाणपद मिळवावे अस होते. ह्या लोकाना स्थविरवादी वा थेरवादी असे नाव पडले हळूहळू त्यातूनच पुढे हीनयान पंथ निर्माण झाला.

दुसरा पक्ष ज्याने बुद्धवचनाचा अर्थ व्यापक रीतीने लावण्याची मुभा घेतली . ठिकठिकाणच्या लोकांचे आचारविचार व समजुती त्यांनी बुद्धधर्माच्या चौकटीत बसाविण्याचा प्रयत्न केला . या लोकांना महासांघिक असे नाव पडले महासांघिकातूनच पुढे महायान पंथ जन्माला आला .ई. स. पू. ४५० ते ई. स. पू. ३५० या कालखंडात हीनयान शुद्ध स्वरुपात होता. हळूहळू लोकप्रियता मिळण्यासाठी स्मृती पुराणांमधील आचारविचार स्वीकारुन ई.स.पू.१००नंतर महायान पंथाचा विकास झाला.

**महायान व हीनयान पंथ व्याख्या** :

महायान व हीनयान या शब्दांची फोड केल्यास आपल्याला खालील अर्थ प्राप्त होतात. सर्वप्रथम यान या शब्दाचा अर्थ बघितल्यास वाहन,गमनागमन साधन असा अर्थ मिळतो.

**महायान** - अर्थात अनेक लोकांना वाहून नेण्यास समर्थ होय. लोकांचे समुदायचे समुदाय निर्वाणाप्रत नेण्यास आपला पंथ समर्थ आहे.आमचे ध्येय सर्व प्राणिमात्रांना धरून चालणारे म्हणून उच्च , व तुमचे वैयक्तिक स्वार्थाचे म्हणून कमी दर्जाचे असे महायान पंथियांना ध्वनित करावयाचे होते.

**हीनयान** - एकाच व्यक्तीला वाहून नेण्यास समर्थ ही संज्ञा महायानानीच दिली, त्यात तुच्छतेचा अंश दिसतो .

**हीनयान पंथ वैशिष्ट्ये -**

- हीनयान पंथ निरीश्वरवादी होता.
- हीनयानाने अर्हत् पद अर्थात स्व प्रयत्नाने निर्वाण प्राप्त करणे ध्येय मानले.

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No IV Issues III
APRIL-MAY 2015 ISSN 2278-5655

- हीनयान पंथ श्रीलंका ,ब्रह्मदेश,सयाम,कंबोडिया या लहान देशातच पसरला.
- 'जगातील सर्व गोष्टी नाशिवंत आहेत,अत:स्वत:च्या निर्वाणासाठी प्रयत्नशील व जागरूक रहा .
- हीनयान बौद्धाला ब्रह्मपेक्षा महान मानतात.

**महायान पंथ वैशिष्ट्ये -**

- महायान पंथात स्थानिक लोकांच्या धार्मिक समजूतीचा महायान पंथात मिलाफ होवू शकत असे.
- महायान पंथात हळूहळू बुद्धालाच देवत्व आले.
- बुद्धाला लोकोत्तर मानतो.
- बुद्धाच्या अवतारांची कल्पना मांडली.
- बुद्ध भक्तिची प्रतिष्ठा झाली.
- पूजाअर्चा,निरनिराळ्या प्रकारचे विधी अशा प्रकारच्या कर्मकांडास महायान पंथाने उत्तेजन दिले.
- बुद्धाच्या आशीर्वादाने आपला उद्धार होवू शकतो.
- बुद्धास शरण गेल्याने त्याच्या सुकृताचा काही अंश आपल्याला मिळेल ही कल्पना पंथास मान्यता होती.
- हिमालय ओलांडून तिबेट,चीन,जपान, कोरिया,मंगोलियामध्ये महायान पंथ पसरला.
- महायान बुद्धाला ब्रह्मासमान मानतात.
- बोधिसत्त्व = बोधि साठी प्रयत्नशील प्राणी
- महायान परंपरेमध्ये बोधिसत्त्व सिद्धांताचा विशेष प्रकाराने विकास केला गेला आणि म्हणून त्यालाच बोधिसत्त्व यान म्हटले गेले.

**बोधिसत्त्व सिद्धांत:**

बोधिसत्त्व संकल्पना ही महायान पंथांनी मांडलेली आहे. बोधिसत्त्व अर्थात प्रज्ञावंत, सात्त्विक, लोकोपकारक व महाकारुणिक अशा अलौकिकसद्‌गुणांचा एक आदर्श पुरुषोत्तम.

बोधिसत्त्व असणारी व्यक्ती परोपकारी, दुसऱ्याचा जीव वाचविण्याकरिता स्वतः संकटात पडण्यास तयार असणारी, करुणासंपन्न, इतर अन्य प्राण्यांना मुक्ती मिळेपर्यंत स्वत: च्या मुक्तीची पर्वा न करणारी म्हणून जास्त आदरणीय मानण्यात येऊ लागली. त्यामुळे बुद्ध होण्याचे ध्येय बाजूस सारले जाऊन बोधिसत्त्वाचे चे ध्येय मानले जाऊ लागले .

दान, शील, शांती, वीर्य, ध्यान व प्रज्ञा ह्या सहा पारमितांवर महायानांनी विशेष भर दिला. ह्या पारमितांच्या आचरणाने बोधिसत्त्वप्राप्ती करून घेऊन त्याद्‌वारे लोकांचे दु:ख कमी करण्याच्या व्रतावर ते भर देतात. बोधिसत्त्व संकल्पनेमुळे फक्त आध्यात्मिकतेऐवजी ह्या आध्यात्मिकतेला सामाजिकतेचे भान देण्यात आणि अंतर्मुखतेऐवजी धर्मास बहिर्मुख करण्यात महायान पंथियांनी आपले वैशिष्ट्य दाखविले . बोधिसत्त्व संकल्पनेबाबत डॉ.बाबासाहेब म्हणतात, बोधिसत्वाच्या या जीवनावस्थांचा वा जातकांचा हा सिद्धांत देवांच्या अवतारवादाच्या ब्राह्मणोक्त सिद्धांतासारखा वाटतो. मात्र ब्राह्मणोक्त अवतारवादात देव नवनवीन अवतार घेऊन भक्तांचे रक्षण करतो; मग त्याचे वर्तन अशुद्ध व अनैतिक असले तरीही चालते. देवाच्या जीवनाची घडण पवित्रतेची असावी अशी अपेक्षा त्यामध्ये नसते.

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No IV Issues III
APRIL-MAY 2015 ISSN 2278-5655

बुद्धाच्या अत्युच्च शुद्धावस्थेच्या जीवनाचे सार असलेला जातक सिद्धांतावर आधारलेला आहे तर बुद्ध होण्यासाठी बोधिसत्त्व एका जीवनावस्थेत एकेक पारमिता पूर्ण करुन 10 सामर्थ्य प्राप्त करुनच बुद्ध होतो. बुद्ध हा बोधिसत्वाच्या जीवनातील कळस होय. सोने तावून सुलाखूनच झळाळी प्राप्त करते तद्वतच बोधिसत्वाला जीवनावस्थांच्या कसोट्यामधुन जावे लागते. असा सिद्धांत दुसऱ्या कोणत्याही धर्मात सापडतच नाही.कोणताही धर्म स्वसंस्थापकाला कसोटीस उतरवत नाही.याप्रकारे ही संकल्पना अत्युत्तम आहे असे बाबासाहेबांचे मत भगवान बुद्ध व त्यांचा धम्म यामध्ये आढळते.

- बौद्ध धर्मामध्ये बोधिसत्त्व सिद्धांत दोन आदर्शाच्या द्वारे प्रादुर्भाव झाला.
  I. भक्ती विकास
  II. भगवान बुद्धाचा अध्यात्मवाद

बुद्ध धर्माच्या स्थापनेच्या प्रारम्भिक काळापासूनच भगवान बुद्धाप्रति भक्ति प्रदर्शित केली जात होती परन्तु हळूहळू त्याला एक आदर्श आध्यात्मिक व विश्वस्वरूप प्रदान केले गेले . जो सामान्य श्रद्धालु बौद्धांच्या भक्ती भावनेपलिकडे गेला . आणि भक्तीच्या साक्षात् अवलंबनाच्या रुपात बुद्धस्थानी बोधिसत्त्वांची निर्मिती झाली.

इ.स.च्या प्रारंभातच बुद्ध हा अवतार म्हणून समजला जाऊ लागला.सद्धर्मपुण्ड्रीक या ग्रन्थात म्हटले आहे. बुध्द उच्च नीच अशा सर्वांचा उद्धार करण्यासाठी अवतार घेत असतो . अवतारवाद स्वीकारल्यानंतर भक्ति ,मंत्र, पूजा, स्तोत्र, ध्यान, मुद्रा, मूर्तीनिर्माण इ.गोष्टींचा संभार त्याच्याभोवती आपोआप उभा राहिला.बुद्धाच्या बरोबरीनेच देवता व बोधिसत्त्व यांचेही अवतार होतात, असे मानले गेले.

**बौध्द धर्मात भक्ती उद्धवविषयक मत**:

- काही विद्वानांच्या मते भक्तीचा उगम हिन्दू परंपरेतून झाला.
- बौद्ध साहित्य भगवद्गीता सारख्या ग्रंथाची नक्कल आहे.
- श्री डब्ल्यू विंटरनिज :- महायान बौद्ध धर्माचा विकास भगवदगीतेच्या भक्ति प्रदर्शनाच्या प्रभावात झाला.
- एच केने : सद्धर्मपुण्डरीक अबौद्ध विचारांनी भरलेले आहे.ते भगवदगीतेतून घेतलेले नाही.
- ई सेनार्त : भागवत संप्रदायापासून बौद्धांनी भक्ती घेतलेली आहे.
- के.जे.सौंदर्स यांनी सद्धर्मपुन्ड्रिकामध्ये भगवद्गीतेपासून भक्ति उधार घेतली असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.
- एल. दे.स.वल्ली.पासीन बौद्ध धर्माला हिन्दू धर्माचे रूपांतर मानतात.
- डॉ.भरतसिंह उपाध्याय यांच्यामतानुसार आचार्य अश्वघोषाच्या द्वारे प्रथम बुद्ध भक्ति साधना केली गेली.यावरून भक्ति व श्रौत परंपरेच्या भक्ती धारेच्या परिणामस्वरूप बौद्ध धर्मात आली .
- आर जी भांडारकर : भगवद्गीता बौद्धपूर्व मानून भक्तीला त्याची विशेषता मानून त्याच्या मौलिकतेचे श्रेय त्याला देतात.
- प्रा.बेलवलकर व प्रो दास गुप्ता सुद्धा गीतेचा रचना काळ बुद्धपूर्व मानतात.
- एडवर्ड जे थॉमस :कृष्ण पूजा व भगवदगीता बौद्ध धर्मपूर्वी प्राचीन असू शकते.

**भक्ति आदर्श बौद्ध परंपरमध्येच निर्माण झाला.**

- बुद्ध भक्तीचा विकास महायान बौद्ध धर्माची आधारभूत विशेषता आहे.
- थेरवादातून मिळालेली ही विरासत आहे.
- जर बौद्ध धर्माने हिन्दू धर्माचा आदर्श स्वीकार केला असता तर बोधिसत्त्वांच्या ऐवजी हिन्दू देवी देवतानाच मानले असते.
- बौध्द धर्माची स्व मौलिकता आहे .अतः हजारो वर्षापासून अन्य धर्मापेक्षा

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No IV Issues III
APRIL-MAY 2015 ISSN 2278-5655

स्वत:चे स्वतन्त्र अस्तित्व निर्माण केले.

- भक्ती शब्द बौद्ध पारिभाषिक शब्द आहे ज्याचा सर्वप्रथम उपयोग पाली साहित्यातच मिळतो.
- थेरगाथेमध्ये भक्ती उल्लेख 'सो भत्तिमा नाम होती पण्डितो ञत्वा च धम्मेसु विसेसि अस्से'
- डॉ हरदयाल यांनी प्राचीनतम काळापासून भक्ति बौद्ध आदर्शाचे एक आविभाज्य अंग होते आणि भक्ति विचार हिन्दुपुर्वी बौध्दामध्येच झाली.
- डॉ गांगुली यांनी बुद्ध मूर्ति या बुद्धाच्या जीवनकालातच निर्माण झाल्या याविषयी काही पुरावे दिले.

1. बुध्दाच्या आदेशाने बिंबिसार राजाने चित्रकाराकडून बुद्धाचे चित्र काढून घेतले.
2. बुद्धाने स्वतः धर्मप्रचारासाठी स्वतःचे चित्र बनवून सिंधुराज रुद्रायनाकडे पाठविले.
3. बुद्धाचा समकालीन क्रूर कोसलनरेशाच्या छळामुळे शाक्य लोक चिनी तुर्कस्थानात गेले तेथील लोक बुद्धाची सुवर्णमूर्तीची पूजा करीत त्यांच्या अनुकरणाने जंगली लोकही पूजा करू लागले तेथून चीनी सम्राटाच्या राजवाड्यात पूजा शिरली.

- भगव या संबोधनावरुन बौद्ध धर्माच्या प्रारंभापासूनच बुद्धाला देव मानण्याची प्रवृत्ती त्यांच्या अनुयायांची होती असे मत काही विद्वान मांडतात.
- भगव अर्थात ईश्वर , किंवा भगवान, असा अर्थ केला जातो.
- भगवान शब्दाचा अर्थ भग अर्थात इच्छा वाण म्हणजे नाश करणे अतः इच्छा नाश करणारा असा अर्थ होतो.
- भगवान बुद्धांनी स्वतः मला देव मानू नये असे प्रवचनांमधून वारंवार सांगितले .
- साधारणपणे कोणत्याही धर्मस्थापकाची विचारधारा शुद्ध स्वरुपात राहत नाही अर्थात त्यात नवनवीन भर पडत जाते, तसेच बौद्धधर्माचेही झाले. अतः भक्ती जोम धरू लागली.अखेरीस धर्मात पूजा मिसळली.

- प्रथमत: पुजेचे स्वरूप बुद्धमूर्ती नसून बुद्ध प्रतीके होती.

**प्रतीक पूजा**:-

[1] शारीरिक अवशेष- अस्थी, केश,रक्षा, इ.

[2] उद्देशिक-पद्म-जन्मप्रतीक, धर्मचक्र-सारनाथ येथील प्रथम धर्मोपदेशाचे चिन्ह, स्तूप-महापरिनिर्वाण द्योतक,त्रिरत्न-त्रिशूलवत बुद्ध,धर्म,व संघ प्रतीक ,श्वेत गज-मायावतीच्या गर्भात प्रवेश स्वप्न व स्वस्तिक.

[3] पारिभौगिक-बुद्धाने उपभोगलेल्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या वस्तू.उदा.बुद्धपाद,वज्रासन,बोधिवृक्ष,छत्र इ.

प्रथम मूर्तिबाबत मतभिन्नता आहे व अजूनही त्याबाबत निश्चितपणे सांगता येत नाही. महायान संप्रदायानी धर्मप्रसाराच्या प्रेरणेने बुध्द मूर्ती पूजा सुरु केली. महाकाय मूर्ती भारतात निर्माण होवू लागल्या.

- डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमध्ये आपल्याला बौद्ध धर्म लयास जाण्याचे कारण काय होते त्याचा बोध होतो त्यांनी असे म्हटले की, कोणताही धर्म लयास जाण्याला तीन कारणे असतात.

  - कोणत्याही धर्माचा पाया कच्चा असल्यास
  - विरोधकांशी वादविवाद करणारे धर्मवेत्ते कमी असल्यास
  - तिसरे कारण सर्वसामान्य जर मूळ धर्माचरण न करता केवल नक्कल करणारे असल्यास धर्माचा लोप होतो.

इतिहासकार अनेक विद्वानांच्या मते सुद्धा बौद्ध धर्माच्या लयास कारणीभूत महायान पंथच आहे. अतः महायान पंथाच्या भक्तीमार्गामुळेच बौद्ध धर्म लयास गेले असा निष्कर्ष काढण्यात दुमत राहत नाही.

**उपसंहार-**

- भगवान बुध्दाने स्वतः भगवंत असल्याचा प्रचार केला नाही.
- इतर धर्मीयांप्रमाणे मी याचा त्याचा अवतार आहे असे कुठेही सांगितले नाही.
- मोक्षदाता मी नाही तर केवल मार्गदाता आहे असे त्याचे सामान्यांना सांगणे होते.
- बुवाबाजी, तंत्र ,मंत्र यांच्या आहारी जावू नका असे लोकांना बजावत होते.
- ही उदात्त विचारसरणी बुद्धांच्या महापरिनिर्वाणाप्रत टिकली तदनंतर त्यांच्या अनुयायांमध्ये फूट पडून महायान पंथियांनी उपरोक्त विचारसरणी पूर्णत :बदलून टाकली.भक्ती व अवतारवाद संकल्पना लोकांच्या पुढयात ठेवल्या. सर्वसामान्य जन इतर धर्मातील चमत्काराप्रमाणेच आपल्यालाही लवकरात लवकर मुक्ती मिळेल या आशेने तंत्र,मन्त्र,अवतार,या सर्वांना मानू लागले.
- बौद्ध धर्माचा नाश होवू लागला.
- महायान पंथाच्या भक्तीमार्गामुळेच बौद्ध धर्म लयास गेले असे विद्वानांचे मत आहे.

आज आपल्याला बौद्ध लोक सगळीकडे देवदेवता व अंधश्रध्दाच्या मागे लागलेले दिसतात त्याचे कारणही आपल्याला महायान पंथातच दिसते.

**संदर्भ ग्रंथसूची** :

1. श्रीनिवास दीक्षित, *भारतीय तत्त्वज्ञान* , फड़के प्रकाशन, कोल्हापुर २०१०.
2. सहाय शिवस्वरूप , *प्राचीन भारतीय धर्म और दर्शन,* मोतीलाल बनारसीदास, २००१.
3. चौधरी सुमेर सिंग, *भारतीय धर्म एवं दर्शन,*
4. चंद्रधर शर्मा *भारतीय अनुशीलन*, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली,१९९०,१९९८.
5. नरेशप्रसाद तिवारी , *भारतीय दर्शन एवं पाश्चात्य दर्शन* , मोतीलाल बनारसीदास , दिल्ली,२००६,२००९.

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
(Bi-Monthly) Peer-Reviewed Journal Vol No IV Issues III
APRIL-MAY 2015 ISSN 2278-5655

6. भदन्त मेधंकर संघवी , *पालि वाड्मय में बोधिसत्त्व सिद्धांत,* काशिनाथ मेश्राम बुद्धभूमी प्रकाशन, नागपूर,२०००.
7. *भारतरत्न डॉ . आंबेडकर बाबासाहेब भगवान बु द्ध आणि त्यांचा धम्म (अनु.तळवटकर,चिटणीस,रेगे), सिद्धार्थ प्रकाशन, मुंबई,२००७.*
8. भारतीय संस्कृतिकोश ,खंड ६ वा पान नं ११९
<http://marathivishwakosh.maharashtra.gov.in/khandas/khand11/index.php?option=com_content&view=article&id=10717viewed

Copyrights @ **Suchita Tajane** ..This is an open access peer reviewed article distributed under the creative common attribution license which permits unrestricted use, distribution and reproduction in any medium, provide the original work is cited.